Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# बचतगट व महिला सक्षमीकरणः एक अध्ययन'

**शिंदे निलेश प्रकाश**

## प्रस्तावनाः

समाजातील मध्यमवर्गीय व दुर्बल घटकांना आशेचा किरण म्हणून बचतगटांकडे पाहिले जाते. देशातील कोट्यावधी महिलांच्या आर्थिकच नव्हे तर भवितव्याला आकार देण्याचे काम बचत गटाच्या रुपाने सुरु झाले आहे. ग्रामीण बँकेच्या कर्जाच्या वसुलीसाठी समुह गट ही संकल्पना राबविण्यात आली. हे गट आपल्या सहकाऱ्याच्या कर्जाची हमी घेतात आणि त्याच्या परतफेडीचीही हमी घेतात.

भारतात स्वयंसहायता बचत गटाची चळवळ म्हैसुर रिसेटलमेंट ॲण्ड डेव्हलपमेंट एजन्सी या संस्थेने सुरु केली. १९८० च्या दशकात नाबार्डने स्वयंसहायता गटाचे मॉडेल स्वीकारुन ग्रामीण भागात त्याचे प्रयोग सुरु केले. १९९१-९२ मध्ये नाबार्डने गटांना वित्तीय सहाय्य देऊन बचतगटांच्या चळवळींना जोमाने प्रारंभ केला. यापूर्वीपासूनच महाराष्ट्रातही ही संकल्पना वेगवेगळ्या स्वरुपात कार्यरत होती याचे पुरावे आढळतात. सन १९९३ मध्ये महाराष्ट्र शासनाने (मुख्यमंत्री शरद पवार) महिला आयोग जाहीर करुन महिला स्वयंसहायता गट चळवळीला प्राध्यान्य दिले. याचाच परिणाम म्हणून ही चळवळ महाराष्ट्र पसरली व आज खेडो-पाडी विविध प्रकारचे बचतगट आढळून येतात.

## बचतगट - संकल्पना, व्याख्या व प्रकारः

स्वातंत्र्योत्तर काळात केंद्र व राज्य सरकारने महिलांच्या कल्याणासाठी अनेक योजना सुरु करण्यात आल्या. या सर्व योजनांचा उद्देश महिला सबलीकरणावर भर देऊन पुरुष व स्त्रीया यांच्यात सर्व बाबतीत समानता प्रस्थापित करणे हा होता. ग्रामीण भागात दारिद्र्य, वर्षानुवर्षे चालत आलेल्या परंपरा, रुढी, चालीरीती यामुळे महिलांची स्थिती खालावलेली दिसून येते. अज्ञान, अशिक्षितपणा, असंघटीतपणा, रोजगाराचा अभाव यामुळे दारिद्र्यात वाढ होते. यामुळे महिलांच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय विकासासाठी बचतगट महत्वाची भूमिका निभाऊ शकते. बचतगटाची एक सर्वसमावेशक व्याख्या खालीलप्रमाणे करता येईल:

"बचतगट हे सहकारी तत्वावर आधारीत आहेत. यात समता, बंधुता, परस्पर सहकार्य, सेवा इ. महान तत्वांचा समावेश आहे. समान आर्थिक व सामाजिक स्तरावर असणाऱ्या महिलांनी एकत्रित येऊन

बचत जमा करुन बँकेकडून कर्ज घेऊन सभासदांच्या गरजा भागविणे म्हणजे बचत गट होय. महिलांनी महिलांच्या आर्थिक उन्नतीकरीता चालविलेले गट म्हणजे बचतगट होय.''

बचतगटांचे आर्थिक स्थितीनुसार दोन प्रकार पडतात. एक म्हणजे दारिद्र्य रेषेखालील बचतगट (बीपीएल) तर दुसरा म्हणजे दारिद्र्य रेषेवरील बचतगट होय. दारिद्र्य रेषेखालील बचतगटांना शासन व बँकेच्या स्तरावर अधिक सवलीत असतात तर या दोन्ही प्रकारच्या बचतगटांना बँकाकडून कर्ज मिळते. याशिवाय बचतगटांचे महिला बचतगट, पुरुष बचतगट, संमिश्र बचतगट असे प्रकार पडतात. असे असले तरी महाराष्ट्रात महिलाच्या बचतगटांची संख्या सर्वाधिक दिसून येते.

**बचतगटाची कार्यपध्दती व वैशिष्ट्ये:**

महिलांचा सामाजिक आणि आर्थिक स्तर उंच करण्यासाठी 'बचतगट' हा उपक्रम सरकारकडून चालवला जातो. महाराष्ट्रातल्या शहरात व गावोगावी अशा प्रकारचे गट स्थापन केले जातात. या गटामध्ये स्त्री किंवा पुरुष असा भेदभाव नाही. कमीत कमी दोन किंवा जास्तीत जास्त २० सदस्यांचे गट तयार केले जातात. अपंग, लघुसिंचन प्रकल्पाचे गटातील सदस्य संख्या ५ ते २० पर्यंत असली तरी चालते. तसेच दुर्गम भाग जसे वाळवंट, डोंगराळ प्रदेश आदि विखुरलेल्या विरळ लोकसंख्येच्या भागातही ५ ते २० सदस्यांचा गट चालु शकतो. यामध्ये प्रत्येक गटातील प्रत्येक सदस्य ठरलेल्या कालावधीमध्ये बचत म्हणून एक ठरावीक रक्कम गटात जमा करते. हा कालावधी आठवडय़ातून एकदा किंवा महिन्यातून एकदा असतो. ही जमा केलेली रक्कम बचतगटातील सदस्यांना कर्ज म्हणून मिळते. सभासदाने हप्त्याहप्त्याने बचतगटाला कर्ज परत करणे अपेक्षित असते. बचतगट लोकशाही तत्त्वावर आधारित असल्याने प्रत्येक सदस्याला समान अधिकार असतो व त्याचे कर्ज व परतफेड कसे करायचे हे तो बचतगट ठरवत असतो. कर्जासाठीच्या अर्जांना प्राधान्य देणे, परतफेड करण्याचा कालावधी ठरवून देणे, आगाऊ कर्जाकरीता व्याजाचा दर ठरविणे, कर्जाच्या परतफेडीच्या हप्त्यांवर बारकाईने नियंत्रण आदि बाबी बचतगटात प्राध्यान्याने केल्या जातात.

बचतगटांना भारतीय रिझर्व्ह बँक, केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाची मान्यता मिळाली आहे. बचतगटाची दरमहा बैठक घेणे आवश्यक असते. गटाचे कामकाज एकमताने व सर्वसहमतीने चालते. गटाचे कामकाज इतिवृत्त, बचतीचा, कर्जाचा हिशोब छापील नोंदवहीत ठेवला जातो. बचत गटाच्या बळावर गटामधून कर्ज घेऊन स्वत:च्या / कुटुंबियांच्या दैनंदिन अडचणी शक्य होऊ शकतात. बचत गटात

सभासदांच्या बचतीच्या प्रमाणात सर्वांना लाभ मिळतो. बचतगटांमुळे महिलांना एकत्रित येण्यासाठी व विचारांची देवाण-घेवाण करण्याचे हक्काचे व्यासपीठ मिळते याशिवाय सामुहिक पध्दतीने निर्णय घेतले जातात, अशी अनेक वैशिष्ट्ये बचतगटाच्या बाबतीत देता येतील.

**बचतगटासाठी शासनस्तरावरील धोरण / तरतुदी:**

स्त्रिया एकत्रित येऊन व्यवसाय करत असल्यामुळे व पारदर्शक सहकाराची प्रक्रिया असल्यामुळे स्त्रियांमध्ये मोठय़ा प्रमाणात उद्योजकता निर्माण झाली आहे. अनेक प्रकारचे उद्योग या चळवळीतून जन्माला आले आहेत. यामध्ये ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागांतून या बचतगटाचे कार्य चालते. ग्रामीण भागातील दारिद्रय़रेषेखालील स्त्रिया बचतगटास ग्रामविकास विभागाच्या ग्राम स्वयंरोजगार योजनेत प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व गट विकास अधिकारी, (पंचायत समिती) यांच्याकडून स्वयंरोजगारासाठी १० हजार रुपये अनुदान दिले जाते व त्यावर बँकेकडून १५ हजार रुपये कर्ज असे एकूण २५ हजार रुपये अनुदान दिले जाते. शहरी भागातील व्यक्तींच्या बचतगटास आयुक्त तथा संचालक महानगरपालिका प्रशासन यांच्या सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेत उपयुक्त, महानगरपालिका व मुख्याधिकारी नगरपालिका यांच्याकडून स्वयंरोजगारासाठी सव्वा लाख रुपये अनुदान व उर्वरित सव्वा लाख राष्ट्रीयीकृत बँकेकडून कर्जरूपाने मिळते. शहरी भागातील दारिद्रय़रेषेखालील लाभार्थ्यांस आयुक्त तथा संचालक, महानगरपालिका प्रशासन यांच्या सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेत उपायुक्त महानगरपालिका व मुख्याधिकारी नगरपालिका यांच्याकडून स्वयंरोजगारासाठी १५ टक्के, परंतु कमाल ७५०० रुपये इतके अनुदान शासनाकडून दिले जाते.

**महिला बचतगटाचे यश:**

बचतगटांनी बनवलेल्या वस्तूंच्या जाहिरातीसाठी आणि विक्रीसाठी सरकारसुद्धा मोठय़ा प्रमाणात सहभाग नोंदवते. शासनाच्या वतीने प्रत्येक जिल्ह्य़ाच्या ठिकाणी बचतगटांनी बनवलेल्या वस्तूंचे, खाद्यपदार्थांचे मोठे प्रदर्शन महाराष्ट्रातल्या प्रत्येक जिल्ह्य़ामध्ये भरवण्यात येते. यामध्ये वेगवेगळया व्यवसायांतल्या महिला बचतगटांनी अतिशय मोठय़ा प्रमाणात सहभाग नोंदविला व कोटय़वधी रुपयांची उलाढाल होते. महाराष्ट्रातल्या विविध जिल्हय़ांमध्ये असलेल्या बचतगटाच्या व्यवसाय तेथील भौगोलिक स्थितीवर खूप अवलंबून असतो. जसे कोल्हापूर येथे दूध व्यवसायावर आधारित बचतगट सामूहिक दुग्ध व्यवसाय शाहुवाडी तालुक्यातील मानकरवाडीच्या सरस्वती महिला बचतगटाने सुरू करून ४००

लोकसंख्या असलेल्या या गावाचा कायापालट घडवून आणला आहे. सोलापूर जिल्हय़ातील अक्कलकोटजवळच्या जेऊर येथील श्री जीवनज्योती महिला विकास बचत हा सॅनिटरी नॅपकिन बनवणारा महाराष्ट्रातला पहिला बचतगट होता.

महिला बचतगट म्हणजे केवळ बचत आणि गरजेपुरता वापर हेच मुळात आता मागे पडले आहे. बचतगटाकडून प्रक्रिया उद्योगाकडे या महिला गटाची वाटचाल होत आहे. नाबार्डकडून महालक्ष्मी सरस त्या राज्यस्तरीय बचतगट प्रदर्शनासाठी विविध नावीन्यपूर्ण बचतगटाच्या उत्पादनांची निवड करून प्रदर्शनात मांडण्यासाठी सरकार मदत करते. ई पोर्टलच्या मदतीने याच माध्यमातून महिला बचतगटांनी तयार केलेल्या उत्पादनांच्या विक्रीसाठी ऑनलाइन सुविधा शासनाकडून उपलब्ध करून देण्यात येत आहे. संपूर्ण महाराष्ट्रात अडीच लाखांपेक्षा अधिक बचतगट असून ३६ लाख महिला संघटित झाल्या आहेत. गावापासून मॉलपर्यंत बाजारपेठ उपलब्ध झाली आहे. एकदंरीत बचतगट हे महिलांच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील वाढीत महत्वाची भूमिका बजावत आहेत.

**ग्रंथसूची :**


- कुलकणी, पी.के. (२००६): समाजशास्त्रातील सैध्दांतीक दृष्टीकोन, मंगेश प्रकाशन, नागपुर
- काचोळे, दा. धो. (१९९५): ग्रामीण समाजशास्त्र, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद.
- कर्वे, स्वाती (२००३): स्त्री विकासाच्या पाऊलखाणा, प्रतिमा प्रकाशन, पुणे.
- गोटे, शुभांगी (२००४): महिला सबलीकरण- स्वरुप व समस्या, वरद पब्लिकेशन्स, औरंगाबाद.
- गोऱ्हे, निलम (१९९७): नारी पर्व, श्री विद्या प्रकाशन, पुणे.
- गुप्ता, कमलेशकुमार (२००५): महिला सशक्तिकरण, बुक एनक्लेव, जयपुर.
- चौधरी, राजेश (२०१०): महिला बचतगट हस्तपुस्तिका, चौधरी पब्लिशर्स, जळगाव
- ठाकरे, गुलाबराव (२००६): बचतगट- एक वरदान, आदर्श विद्यार्थी प्रकाशन, पुणे.
- मुलाणी, एम. यु. (२००७): महिला स्वयंसहायता बचतगट, डायमंड प्रकाशन, पुणे.